# राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे

## राज्य पुरस्कृत योजना

## मार्गदर्शक सूचना - सन २०१७-१८

**प्रस्तावना -**

गॅट कराराद्वारे जगात मूक्त अर्थव्यवस्था मान्य करण्यात आली आहे. राज्यातील शेतक-यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय यापुढे न राहता उत्पादीत होणा-या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतक-यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसीत होत असलेले तंत्रज्ञान हे शेतक-यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहोचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे निकडीचे आहे. कृषि विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्याकरीता करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी कृषि विभागाकडून त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

विविध देशांनी विकसीत केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतक-यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ याबाबत त्या त्या देशातील शास्त्रज्ञ, शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा, क्षेत्रिय भेटी तसेच संबंधीत संस्थांना भेटी इ. द्वारे शेतक-यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरीता राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित करणे, हे या योजनेचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेरील अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात येत आहे.

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता, पीक पध्दतीमधील आधुनिक तंत्रज्ञान, कृषि उत्पादनांचे बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी, कृषि प्रक्रियेमधील अद्ययावत पध्दती यामध्ये आमुलाग्र बदल आणण्यासाठी शेतक-यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील योग्य त्या प्रगतशिल शेतक-यांची विविध स्तरावरील समित्यांमार्फत अंतिम निवड करुन परदेशातील आधुनिक कृषि तंत्रज्ञान पाहण्याची संधी त्यांना उपलब्ध करण्यासाठी सदर मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे ही योजना अधिक परिणामकारकपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शेतकरी निवडीचे निकष-**

१) अभ्यास दौ-याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी असावा.

२) स्वतःच्या नावे असलेला ७/१२ व ८-अ उतारा आवश्यक आहे.

३) उता-यावर नोंदविलेले क्षेत्र पिकाखालील असावे.

४) शेतक-याने उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, हे स्वसाक्षांकित करावे व तसे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणीत करावे.

५) शेतक-याची निवड करताना खाली नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन प्राथमिक निवड करावी व यामधून सोडत पध्दतीने जेष्ठता क्रमवारी निश्चित करावी.

अ) अनुसूचित जाती/जमाती या प्रवर्गातील शेतक-यांना व महिला शेतक-यांना अभ्यास दौ-यामध्ये प्रतिनिधीत्व असावे. परंतू वरील घटकांतील लाभार्थी शेतकरी उपलब्ध न झाल्यास इतर सर्वसाधारण घटकामधून शेतकरी लाभार्थी निवडता येतील. जेणेकरुन दौरा कार्यक्रमावर विपरीत परिणाम होणार नाही.

ब) शेतकरी कुटूंबामधून फक्त एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. (कुटूंब या व्याख्येमध्ये पती, पत्नी व अविवाहीत असलेली मुले/मुली) (सोबत शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडावी)

६) शेतक-याचे वय वर्ष २५ ते ६० या दरम्यान असावे. त्यासाठी पुरावा म्हणून जन्मदाखला किंवा तत्सम प्रमाणपत्र सोबत जोडावे.

७) शेतकरी शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस नसावा. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. व्यावसाईक नसावा. तसे त्याने स्वतः आणि संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करावे.

८) शेतकरी वैध पारपत्रधारक असावा. पुराव्यासाठी पारपत्राची मुदत/वैधता दर्शविणा-या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी. पारपत्राची मुदत दौरा निघण्यापूर्वी किमान सहा महिने असावी.

९) शेतक-याने यापूर्वी शासकीय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत, कृषि विद्यापिठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नसावा. तसे त्याने स्वतः आणि संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रतिस्वाक्षरीत (countersigned) करावे.

१०) शेतक-यास परदेश अभ्यास दौ-यास जाण्यापूर्वी कोणत्याही प्रकारच्या संसर्गजन्य रोगाची लागण झालेली नसावी, तसेच सलग १०-१५ दिवस कालावधीचा परदेश दौरा संबंधित देशामध्ये करण्यास शेतकरी पात्र आहे, याबाबतचे तालुका/जिल्हा स्तरावरील शासकीय आरोग्य अधिकारी किंवा तत्सम दर्जाच्या वैद्यकीय अधिका-याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

११) परदेश अभ्यास दौ-याच्या निवडीकरीता शेतकरी सर्व निकष पूर्ण करीत असल्याबाबत जिल्हास्तरीय समितीचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

**सन २०१७-१८ या वर्षासाठी अभ्यास दौ-याकरीता निवड करण्यात आलेल्या प्रवासी कंपन्या, देश व रकमेचा तपशील (रक्कम रुपयात)**

| अ. क्र. | दौ-याचा तपशील | प्रवासी कंपनी | मंजूर दर प्रती माणसी | मंजूर मापदंडानुसार शासन अनुदान हिस्सा | मंजूर मापदंडानुसार शेतकरी हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | इस्त्राईल (एकूण ६ दिवस व ५ रात्री) | ग्रॅन्ड व्हेकेशन्स प्रा. लि. मुंबई | १,०२,९९८/- | ५१,४९९/- | ५१,४९९/- |
| २ | जर्मनी/नेदरलॅन्डस् (एकूण ७ दिवस व ६ रात्री) | कॉक्स अॅन्ड किंग्ज लि. मुंबई | १,२७,६९६/- | ६३,८४८/- | ६३,८४८/- |
| ३ | ऑस्ट्रेलिया (एकूण १० दिवस व ९ रात्री) | साईदत्त टूरीझम, पुणे | २,४३,१६७/- | १,००,०००/- | १,४३,१६७/- |

**अनुदानाचा तपशील-**

१. शासनाकडून अभ्यास दौ-याकरीता सर्व घटकातील शेतक-यांना एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु.१.०० लाख (रुपये एक लाख फक्त) यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.

२. दौ-याची तारीख निश्चित झाल्यानंतर कृषि विभागाशी संपर्क साधून दौ-यामध्ये निवड झाल्याची खात्री केल्याशिवाय शेतक-यांनी शासकीय अनुदानाव्यतिरिक्त स्वहिस्सा म्हणून भरावयाची रक्कम दौरा आयोजित करणा-या कंपनीकडे भरणा करु नये.

३. वरील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार एकुण खर्चामध्ये विमान प्रवास, निवास व भोजनाचा खर्च, व्हिसा इ. खर्चाचा समावेश आहे. यानुसार येणा-या एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम अथवा कमाल रु.१.०० लाख पर्यंत अनुदान देय आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शेतक-याने दौ-यास जाण्यापूर्वी निश्चित केलेल्या प्रवासी कंपनीकडे भरणा करावी. तत्पुर्वी प्रवासाकरीता भेटींची स्थळे, निवास व्यवस्था, विमान प्रवास इ. संदर्भातील तपशील, अल्पोपहार व जेवणाची सोय इ. बाबत तारीखनिहाय माहिती प्रवासी कंपनीमार्फत शेतक-यास देण्यात येईल.

४. वरील दराव्यतिरिक्त परकीय चलनामध्ये होणारी वाढ किंवा घट यामधील फरक देण्यास शासनाने शासन पत्र क्र.शेअदौ-४२१२/प्र.क्र.१०१/३-अे, दिनांक २२/०२/२०१३ नुसार मंजूरी दिली आहे. ज्या महिन्यात दौरा आयोजित केला जाणार आहे, त्या महिन्यातील ०१ तारखेस भारतीय रिझर्व्ह बँकेचा विनिमय दर विचारात घेऊन हा फरक प्रवासी कंपन्यांना दिला जातो. या फरकाच्या रकमेच्या ५० टक्के अनुदान (अधिकतम अनुदान रु.१.०० लाखाच्या अधिन राहून) देय आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या शेतकरी हिश्श्यापेक्षा अधिक रक्कम शेतक-यांना द्यावी लागेल. ही रक्कम दौरा आयोजित करताना कंपनीच्या निदर्शनास आणली जाईल व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दौ-यावर जाणा-या शेतक-यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

५. शेतक-यांचा स्वहिस्सा (५० टक्के) रकमेसाठी कोणत्याही इतर शासकीय/निमशासकीय योजनेचा लाभ घेता येणार नाही.

६. वर नमूद केल्याप्रमाणे याव्यतिरिक्त येणारा इतर बाबींवरील खर्च शेतक-याने स्वतः करावयाचा आहे.

**शेतक-यांनी पाळावयाच्या अटी/शर्ती -**

सदर योजनेअंतर्गत देशाबाहेरील अभ्यास दौ-यांमध्ये सहभागी होताना शेतक-यास खालील अटी/शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

१) शेतक-याने दौ-यास जाण्यापूर्वी शासनाने ठरवून दिलेल्या देश समुहापैकी कोणत्या देशात व कोणत्या विषयावरील अभ्यास करण्याकरीता जायचे आहे, याबाबत विहीत प्रपत्रातील अर्जात माहिती भरणे

आवश्यक आहे. तथापी, कोणत्या देशात शेतक-यांना पाठवावयाचे याचे अधिकार राज्य स्तरावरील समितीला राहतील.

२) शेतक-याच्या दुर्वर्तनामुळे परदेशातील एखाद्या देशामार्फत काही कायदेशीर कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा विदेश दौ-यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत शेतक-याची राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च शेतक-याला स्वतःला सोसावा लागणार आहे, तसे स्वयंघोषणापत्र अर्जासोबत जोडावे. (प्रपत्र-१)

३) विदेश अभ्यास दौ-यादरम्यान धुम्रपान व मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे. विदेश अभ्यास दौ-यादरम्यान वैयक्तीक वागणुकीमुळे कृषि विभाग किंवा देशाच्या अभिमानास तडा जाईल असे कोणतेही वर्तन होणार नाही, दौ-यादरम्यान मद्य प्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे, दौ-याच्या कार्यक्रमादरम्यान दौ-याच्या निश्चित वेळेचे पालन न करणे, नियोजीत केलेल्या स्थळ/भेटी इत्यादी कार्यक्रमांना भेटी न देणे, परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ. केल्याचे आढळल्यास संबंधीत देशाच्या नियमानुसार जो दंड आकारला जाईल तो त्या देशाच्या चलनाच्या स्वरुपात दंड म्हणून स्वतः शेतक-याला भरावा लागेल. (प्रपत्र-१)

४) पुर्वानुभव लक्षात घेता काही शेतकरी मुक्कामाच्या ठिकाणाहून रात्री उशीरा बाहेर पडतात. असे करणे परकीय देशात धोकादायक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रामुख्याने भाषा, अनोळखी ठीकाण, तेथील नियम अटी, कायदे, सामाजिक सुरक्षा इ. बाबी विचारात घेता दौ-यादरम्यान मुक्कामाच्या ठिकाणी हॉटेलमध्ये वास्तव्यास गेल्यानंतर रात्रीच्यावेळी कोणत्याही परिस्थितीत सहभागी शेतक-यास निवासाचा परिसर सोडता येणार नाही.

५) प्रवास कालावधीत कोणत्याही स्वरुपाचा अपघात किंवा दुखापत झाल्यास याची जबाबदारी शेतक-याची राहील. याबाबतचे स्वयंघोषणापत्र (प्रपत्र-१) शेतक-यांकडून घेऊन मुळ अर्जासोबत जोडावे.

६) अभ्यास दौ-याबरोबर गेलेल्या प्रत्येक शेतक-याने अभ्यास दौ-याबरोबरच परत यावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतक-यास अभ्यास दौ-यांच्या मंजूर कालावधीनंतर परदेशात कोणत्याही कारणास्तव वास्तव्य करता येणार नाही. याबाबतचे स्वयंघोषणापत्र (प्रपत्र-१) शेतक-यांकडून घेऊन मुळ अर्जासोबत जोडावे. जर एखाद्या शेतक-याने या नियमांचे उल्लंघन केले तर त्याला कृषि विभाग/शासन जबाबदार राहणार नाही. त्यासंबंधी परदेशातील नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार संबंधीत देशाच्या प्रशासनास राहतील. त्याबाबत कृषि विभाग कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.

७) सदर दौरा हा कृषि विभागाने निश्चित केलेल्या दौरा कार्यक्रमाप्रमाणे राहील. त्यामध्ये शेतक-यांना स्वतः कोणत्याही वेगळ्या भेटींचा समावेश करता येणार नाही. नियोजीत कार्यक्रमाव्यतिरीक्त दौ-याचा गट सोडून इतरत्र भेटी देता येणार नाहीत.

८) शेतक-याने दौरा पूर्ण झाल्यानंतर विहीत प्रपत्रात (प्रपत्र-४) दौ-याबाबतचे सविस्तर अभिप्राय देणे आवश्यक आहे. अभ्यास दौ-यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर/परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबत विहीत प्रपत्रामध्ये माहिती भरुन देणे आवश्यक आहे.

९) सदर दौरा हा शेतकरी अभ्यास दौरा असल्याने प्रवासामधील ज्या ठिकाणांना भेटी द्यावयाच्या आहेत त्याची पूर्व कल्पना, परदेशामध्ये पाळावयाची बंधने, पूर्व तयारी, हवामानानुसार पेहराव, सोबत जड सामानांची वजन मर्यादा, इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्याबाबतची मान्यता, चलन उपलब्धता वगैरे माहिती शेतक-यांना मराठीमध्ये लेखी स्वरुपात दौरा सुरु होण्याआधी पुरेशा कालावधीमध्ये संबंधित कंपनीकडून देण्यात येईल. त्यानुसार त्या सुचनांचे काटेकोर पालन करणे संबंधीत शेतक-यास बंधनकारक राहील.

१०) दौरा सुरु झाल्यानंतर परदेशातील आपले संपर्कासाठी असलेला, भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास आणि दौरा सोबतचे अधिकारी यांना लेखी देणे बंधनकारक राहील. तसेच आपल्या कुटूंबातील जवळच्या दोन व्यक्तींचे संपर्क क्रमांकसुध्दा प्रवासी कंपनी तसेच कृषि आयुक्तालयास देणे आवश्यक आहे.

११) दौरा निघण्यापुर्वी अथवा दौरा कालावधीत शासनाने कोणतेही नवीन नियम/अटी लागू केल्यास त्या पाळणे शेतक-यांवर बंधनकारक राहील.

१२) या योजनेध्ये सहभागी होऊ इच्छिणा-या शेतक-यांना वरील अटी व शर्तींची जाणीव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिकारी यांनी करुन द्यावी. विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक सर्व प्रपत्रासह माहिती सादर करावी.

१३) दौ-याच्या भेटीच्या ठिकाणांचा तपशील दौरा निघण्यापुर्वीच शेतक-यांना देण्यात येत असल्यामुळे त्या त्या ठिकाणांची तांत्रिक व इतर माहिती इंटरनेटच्या माध्यमातून शेतक-यांनी स्वतःजवळ संकलीत करुन घ्यावी.

१४) शेतक-याने त्याची मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती अर्जासोबत देण्याची मुभा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.प्रसुधा-१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दिनांक ०९/३/२०१५ नुसार शेतक-यास देण्यात येत असून अशा स्वयंसाक्षांकित प्रती शेतक-यांकडून स्विकारण्यात याव्यात. मात्र शेतक-याने दिलेल्या स्वयंसाक्षांकित प्रतींच्या सत्यतेबाबत प्रपत्र-३ नुसार **स्वयंसाक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र** शेतक-याने देणे बंधनकारक आहे.

१५) वरील दोन्ही स्वघोषणापत्रे (प्रपपत्र- १ व २) साध्या कागदावर करता येतील. त्याकरीता न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.

१६) वरील दोन्ही स्वघोषणापत्रावर संबंधीत शेतक-याचे सुस्पष्ट असे अलिकडच्या काळातील छायाचीत्र (फोटो) असावे. उपलब्ध असल्यास त्यावर संबंधीत शेतक-याचा आधार क्रमांकदेखील नमूद करावा.

**शेतकरी निवडीची कार्यपध्दती -**

राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत शेतक-याने सोबत सहपत्रित केलेल्या अर्जाप्रमाणे माहिती भरुन संबंधीत **तालुका कृषि अधिकारी** यांनी प्रस्ताव स्विकारावेत.

- ❖ तालुका कृषि अधिकारी यांनी **प्रपत्र-६** मध्ये निश्चित केलेल्या कालावधीपर्यंतच प्रस्ताव स्विकारावेत. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी व छानणी करुन जे शेतकरी अटी व शर्तींची पूर्तता करत आहेत अशा पात्र शेतक-यांचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे विहीत कालावधीत पाठवावेत.
- ❖ ज्या शेतक-यांचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविले आहेत, अशा शेतक-यांची यादी तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यालयाच्या दर्शनी भागात डकवावी. जेणेकरुन अर्ज केलेल्या शेतक-यांना त्यांचे नाव सोडतीसाठी वरीष्ठ कार्यालयास पाठविल्याची खात्री होईल.

जिल्हा स्तरावर खालील समितीचे गठन करण्यात येत असून समितीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**जिल्हास्तरीय समिती -**

विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकडे शिफारस करण्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - अध्यक्ष |
| २) प्रकल्प संचालक, आत्मा | - सदस्य |
| ३) जिल्हा कार्यक्षेत्रातील एक उप विभागीय कृषि अधिकारी | - सदस्य |
| ४) विभागीय कृषि पणन व्यवस्थापक (संबंधीत विभाग) | - सदस्य |
| ५) कृषि विस्तार विद्यावेत्ता | - सदस्य |
| ६) जिअकृअ कार्यालयातील कृषि उपसंचालक | - सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा -**

१) अभ्यास दौ-यासाठी अर्ज मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रामधून जाहीरात प्रसिध्द करुन आवाहन करावे.

२) तालुका स्तरावरुन पात्र शेतक-यांचे प्रस्ताव जिल्हास्तरावर विहीत कालावधीमध्ये (प्रपत्र-६) प्राप्त झाल्यानंतर समितीने मार्गदर्शक सूचनांमधील अटी/शर्तीनुसार प्रस्तावांची तपासणी/छानणी करावी. समितीने तपासणी/छानणी करुन सर्व पात्र ठरविलेल्या प्रस्तावांची सोडत पध्दतीने शेतक-याची जेष्ठता क्रमवारी निश्चित करावी.

३) सोडत पध्दत ही जिल्हास्तरीय समितीसमोर घेण्यात यावी व सोडतीचा दिनांक, वेळ, ठिकाण इ. ची माहिती स्थानिक वृत्तपत्रामधून प्रसिध्द करावी.

४) सोडतीकरीता उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवांना सोडत काढणेपुर्वी सोडत प्रक्रियेची थोडक्यात सविस्तर माहिती द्यावी.

५) सोडत ही पूर्ण पारदर्शक होण्यासाठी याचे चलचित्रीकरण (व्हीडीओ ग्राफिक्स) करावे.

६) सोडत प्रक्रियेचे इतिवृत्त तयार करुन त्यामध्ये सर्व अवलंबिलेल्या प्रक्रियेचा उल्लेख करावा. समिती सदस्याशिवाय सोडत प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या व उपस्थित असलेल्या शेतक-याची स्वाक्षरी घेण्यात यावी.

७) सोडत प्रक्रिया राबवून तयार केलेली जेष्ठता क्रमवारी यादी कार्यालयाबाहेर दर्शनी भागात डकवावी.

८) अभ्यास दौ-याच्या निवडीकरीता शेतकरी सर्व निकष पूर्ण करीत असल्याबाबत जिल्हास्तरीय समितीने प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे. असे निकष पूर्ण केलेले प्रस्ताव समितीच्या इतिवृत्त व जेष्ठता क्रमवारी यादीसह विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावेत.

९) विभागीय कृषि सहसंचालक यांनी जिल्ह्यांकडून जेष्ठता क्रमावारीसह प्राप्त झालेल्या शेतक-यांचे प्रस्ताव तपासून सदर शेतकरी दिलेल्या अटी व शर्तीमध्ये पात्र होत असल्याबाबत प्रमाणीत करुन जिल्हानिहाय परिपूर्ण प्रस्ताव आयुक्तालयास विहीत कालावधीमध्ये (प्रपत्र-६) सादर करावेत. सदरील शेतक-यांच्या योग्यतेची तपासणी अंतीम राहील.

१०) दौरा पूर्ण झाल्यानंतर दौ-यावर जाऊन आलेल्या शेतक-यांची सविस्तर यादी तयार करावी. तसेच शेतक-यांचे अभिप्राय जतन करुन ठेवावेत. यापैकी योग्य शेतक-याचा संसाधन व्यक्ती म्हणून प्रशिक्षणासाठी, शेती शास्त्रासाठी उपयोग करावा. अभ्यास दौरा केलेल्या शेतक-याने त्याच्या शेतीमध्ये कोणता सकारात्मक बदल केला, त्याचे मुल्यमापन करुन तसे आयुक्तालयास कळवावे.

जिल्ह्यातील जे शेतकरी अभ्यास दौ-यास जाऊन आले असतील अशा शेतक-यांनी कोणते नवीन तंत्रज्ञान अवगत केले अथवा परिसरातील इतर शेतक-यांना मार्गदर्शन केले याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आपल्या संबंधीत विभागामार्फत आयुक्तालयास सादर करावा. तसेच अशा शेतक-यांचा आत्मा किंवा कृषि विस्ताराच्या तत्सम योजनांमध्ये सहभाग वाढवावा. तसेच या शेतक-यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करुन घ्यावे. राज्यातील सर्व प्रादेशिक कृषि संभागांमार्फत आयुक्तालय स्तरावर प्राप्त झालेले शेतक-यांचे प्रस्ताव आर्थिक वर्ष संपेपर्यंत वैध राहतील व यानंतर आपोआप रद्द होतील. चालू आर्थिक वर्षामध्ये अभ्यास दौ-याकरीता ज्या शेतक-याची निवड झाली नसेल अशा शेतक-यास पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

**राज्यस्तरीय समिती -**

जिल्हा स्तरावरील समितीने शिफारस केलेल्या शेतक-यांच्या अर्जांची तपासणी केल्यानंतर शेतक-यांना विदेश दौ-यावर पाठविण्याचा अंतिम निर्णय आयुक्त, कृषि यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय

समिती घेईल. सदर समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकवेळा किंवा आवश्यकतेनुसार आयोजीत करावी. समितीची रचना पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| १) आयुक्त (कृषि) | - अध्यक्ष |
| २) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) | - सदस्य |
| ३) कृषि संचालक (निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण) | - सदस्य |
| ४) कृषि संचालक (फलोत्पादन) | - सदस्य |
| ५) कृषि संचालक (मृद संधारण व पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन) | - सदस्य |
| ६) कृषि संचालक (नियोजन व कृषि प्रक्रिया) | - सदस्य |
| ७) कृषि संचालक (आत्मा) | - सदस्य |
| ८) कृषि सहसंचालक (वि.प्र.२) | - सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा -**

१. राज्यातील सर्व प्रादेशिक कृषि संभागांमार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांनुसार आयुक्तालयातील राज्यस्तरीय समितीने जेष्ठता क्रमावारीनुसार शेतक-यांची अंतिम निवड करावी.

२. प्रत्येक दौ-यामध्ये सर्व प्रादेशिक कृषि संभागांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळेल, याची समितीने दक्षता घ्यावी.

३. एका अभ्यास दौ-यात कमाल ४५ शेतक-यांचीच निवड करावी. परदेशामध्ये ५० पेक्षा जास्त गटाचे व्यवस्थापन करण्यास अडचणी येत असल्याचे दिसून आल्याने यापुढे कोणत्याही दौ-यात शेतकरी/ अधिकारी यांची संख्या ५० पेक्षा जास्त नसावी.

४. परदेशातील कृषि हवामान परिस्थितीचे वेळापत्रक आणि योजनेतील विविध स्तरावरील निर्णयांचे वेळापत्रक यांचा ताळमेळ राखून दौरा कार्यक्रमाचे व्यवस्थापन यशस्वीपणे पार पाडावे.

५. समितीने अभ्यास दौ-यास पाठवावयाच्या अधिका-यांच्या निवडीची शिफारस शासनास करावी.

**अधिकारी निवडीचे निकष -**

शेतक-यांना विदेशातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती तसेच विदेशातील शेती विषयक ज्ञान देण्यासाठी कृषि विभागातील अनुभवी व माहितगार **वर्ग-१ चे** अधिकारी व कृषि विद्यापिठातील प्रत्यक्ष संशोधन करणारे **वर्ग-१ चे** अधिकारी किंवा शास्त्रज्ञ यांची अभ्यास दौ-याकरीता कृषि आयुक्तालयामार्फत शासनास शिफारस करण्यात येईल. संबंधीत अधिका-यांच्या दौ-याचा पूर्ण खर्च शासनामार्फत करण्यात येणार आहे. अशा अधिका-यांची निवड करण्याकरीता खालील निकषांची पूर्तता करण्यात यावी.

१) वैध पारपत्र धारक असावा.

२) शासकीय सेवेत किमान ०३ वर्ष राजपत्रीत पदावर काम केल्याचा अनुभव असावा. तसेच दौ-यास निवड होतेवेळी किमान एक वर्ष सेवा शिल्लक असणे आवश्यक आहे.

३) निवड केलेल्या अधिका-याची कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसल्याचे अधिका-याने स्वसाक्षांकित करावे व तशी खात्री कार्यालय प्रमुखांनी करुन प्रमाणित करावे.

४) यापुर्वी शासकीय खर्चाने परदेश अभ्यास दौरा केले नसल्याची खात्री करुन घ्यावी व त्यास कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करावे.

५) शासकीय सेवेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम, स्थानिक कृषि विषयक प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार/उपक्रम राबविणा-या अधिका-यांना प्राधान्य देण्यात यावे.

६) प्रपत्र-३ मध्ये वैयक्तीक माहितीच्या नमुन्यातील विविध बाबींची पूर्तता करण्यात यावी.

७) अधिका-यांना परदेशामध्ये जाण्याच्या मर्यादीत संधी विचारात घेऊन यापुर्वी शासकीय खर्चाने प्रवास न केलेल्या अधिका-यांचा दौ-यासाठी प्राधान्याने विचार करावा.

**अधिका-यांची जबाबदारी -**

अभ्यास दौ-यासोबत ज्या अधिका-याची निवड करण्यात येते अशा अधिका-यांवर शासनाचे प्रतिनिधीत्व तसेच दौरा कार्यक्रमाचे नियंत्रण करण्याची जबाबदारी देण्यात येत आहे. अशा अधिका-यांनी दौ-याच्या गटाचे नेतृत्व करुन दौरा पूर्ण होईपर्यंत दौ-याचे संपूर्ण व्यवस्थापन व समन्वय राखणे आवश्यक आहे. तसेच प्रवासी कंपनीच्या दौरा व्यवस्थापकाच्या सहकार्याने तांत्रिक स्थळभेटीच्यावेळी गटाला आवश्यक ती माहिती देण्याची तसेच दौरा यशस्वीरित्या पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिका-यांची राहील. दौरा पूर्ण झाल्यानंतर निवडलेल्या अधिका-यांनी तांत्रिक भेटींच्या फोटो व माहितीसह संपूर्ण अहवाल एका आठवड्याच्या आत सॉफ्ट व हार्ड कॉपीसह सादर करणे आवश्यक आहे. अधिका-यांना स्वतःच्या राज्यातील कृषि विषयक विस्तृत माहिती असावी. निवड झालेल्या अधिका-यांनी ज्या देशात भेटी द्यावयाच्या आहेत तेथिल कृषि हवामान, भौगोलिक, राजकीय व ऐतिहासिक माहिती इंटरनेटव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

दौ-यादरम्यान कोणत्याही प्रकारचे वाद अथवा कारवाई संदर्भात घटना घडल्यास दौ-यासाठी निवडलेल्या शासकीय अधिका-यांनी समन्वय व प्रसंगावधान राखून सदर प्रश्न निकाली काढावा व याबाबत कृषि आयुक्तालयास त्वरीत अवगत करावे. याकरीता आवश्यकतेनुसार लेखी जबाब घ्यावेत व त्यावर दोन साक्षीदारांच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

दौ-यामध्ये सहभागी झालेल्या अधिका-यांनी दौरा पूर्ण झाल्यानंतर शेतक-यांकडून विहीत प्रपत्रामध्ये त्यांचे अभिप्राय तसेच दौ-यानंतर आपल्या शेतीमध्ये आणि परिसरातील शेतीमध्ये करावयाचे प्रयोग/बदल याबाबतचा आराखडा प्राप्त करावा व जिल्हानिहाय त्याचे संकलन करुन संबंधीत जिल्ह्याकडे तसेच कृषि आयुक्तालयाकडे प्रत सादर करावी. त्याचप्रमाणे अभिप्रायामध्ये नमूद केल्यानुसार शेतक-याला नवीन प्रयोग करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात यावे व त्याचा पाठपुरावा करुन अभिप्रायासह निष्कर्ष कृषि आयुक्तालयास सादर करावे.

**प्रवासी कंपन्यांची जबाबदारी -**

शेतक-यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे आयोजित करण्यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन आयुक्तालय स्तरावर प्रवासी कंपन्यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या दौरा कंपनीने कृषि विभागासोबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे. प्रत्येक दौ-यासाठी जास्तीत जास्त दोन देशामधील भेटींच्या स्थळांचा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. सदर ठिकाणांची निश्चिती करताना प्रवासी कंपन्यांच्या प्रतिनिधींनी त्या त्या देशातील कृषि विषयक तज्ञांकडून माहिती सादर करावी. त्यावर कृषि विभागाने तपासणी करुन दिवसनिहाय कार्यक्रमाची आखणी करावी. सदर स्थळभेटीच्या तपशीलास राज्यस्तरीय समितीमार्फत अंतिम मान्यता देऊन दौरा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. सदर दौरा जास्तीत जास्त ७ ते १० दिवसांचा असेल. दौ-याकरीता इस्त्राईल, जर्मनी, नेदरलँड, द्विपक्षीय करार झालेले देश, जागतिक बँकेच्या अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रकल्पांमध्ये समाविष्ट असलेले देश इ. चा समावेश करण्यात येईल. निवड झालेल्या प्रवासी कंपन्यांना कृषि विभागाने शेतकरी निवड व त्यांच्याकडून घ्यावयाच्या बुकींगबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

निविदा प्रक्रियेमध्ये अंतिम निवड झालेल्या प्रवासी कंपनीने निविदा सुचनेनुसार दौ-याचा तपशील जोडणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार बदल सुचवायचा झाल्यास त्याची मान्यता घेणे बंधनकारक राहील. दौरा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर शेतक-यांचे विहीत कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.

१) राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेल्या शेतक-यांच्या निवड यादीमधून एका दौरा कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार शेतक-यांच्या नावांची यादी कंपनीकडे पाठविण्यात येईल. कंपनीने एक आठवड्याच्या कालावधीत त्यांच्याशी संपर्क साधुन दौ-यास जाण्याकरीता होकार दिलेले, नकार दिलेले आणि निर्णय प्रलंबीत ठेवलेले याप्रमाणे वर्गीकरण करुन आयुक्तालयास कळवावे. कंपनीने आवश्यकता असल्यास अधिकच्या नावांच्या यादीची मागणी आयुक्तालयाकडे करावी. एकदा दिलेल्या यादीतील सर्व शेतक-यांबद्दल निश्चित निर्णय झाल्यानंतरच कंपनीस पुढील यादी देण्यात येईल. होकार दिलेल्या शेतक-यांकडून आवश्यक ती कागदपत्रे कंपनीने जमा करावी.

२) ज्या शेतक-यांकडून दौ-यामध्ये सहभागी होण्याकरीता होकार मिळेल अशा शेतक-यांना नियोजित स्थळ-भेटी कार्यक्रमाचा तपशील, विमान प्रवासाबाबतचा तपशील, निवास व भोजन व्यवस्थेबाबतचा तपशील, पुणे येथून विमानतळापर्यंत असणा-या प्रवास सुविधेचा तपशील, कृषि विभागाच्या लेखी मान्यतेचे पत्र, यापुर्वी शासकीय अनुदानाने देशाबाहेर दौरा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र इ.बाबींची पूर्तता केल्यानंतर शेतक-याच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम घेण्यात यावी.

३) एका अभ्यास दौ-यामध्ये जास्तीत जास्त ४५ शेतक-यांचा गट तयार करुन, शेतक-यांची यादी व व्हिसा कार्यालयास पाठवावयाचे पत्र आयुक्तालयास सादर करावे. कोणत्याही दौ-यास शेतक-याचे नाव

प्रस्तावीत करताना त्याने यापुर्वी देशाबाहेरील अभ्यास दौ-यासाठी कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतला नसल्याची खात्री करुनच शेतक-यांची निवड यादी व्हीसा प्रक्रियेसाठी सादर करावी. **यादी व्यतिरिक्त कोणत्याही वैयक्तीक अथवा इतर कारणांकरीता अधिकच्या नावांची व्हीसा मंजूरीसाठी शिफारस करु नये व या यादी व्यतिरिक्त कोणतीही जादाची व्यक्ती गटासोबत दौ-यास घेऊन जाऊ नये.**

४) दौ-याचा सविस्तर तपशील, निवास भोजनाचा तपशील, शेतक-यांची प्रमाणीत यादी, पारपत्र व व्हीसाच्या प्रतींसह एक प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. **अभ्यास दौ-याचे निर्गमन झाल्यानंतरच उर्वरीत ५० टक्के शासकीय अनुदान आरटीजीएसद्वारे कंपनीस देण्यात येईल.**

५) प्रत्येक अभ्यास दौ-याकरीता अनुभवी दौरा व्यवस्थापक असावा. परदेशी भाषा, विशेषतः इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेला, ज्या देशांमध्ये दौरा आयोजित करावयाचा त्या देशातील ऐतिहासीक, भौगोलीक, राजकीय, वैज्ञानिक बाबींची उत्तम माहिती असलेला, कार्यतत्पर, सहकार्याची भावना असणारा असावा. अशा निश्चित केलेल्या दौरा व्यवस्थापकाचे नाव व संपर्क क्रमांक शेतक-यांकडून बुकींगची रक्कम स्विकारतानाच देण्यात यावे.

६) पुणे येथून विमानतळापर्यंत तसेच परदेशात पोहोचल्यानंतर तेथील स्थानिक स्थळ-भेटीच्या प्रवासाकरीता सुस्थितीतील वातानुकूलीत बसची सुविधा उपलब्ध करुन दौरा पुर्ण करावा. देशात परतल्यानंतर विमानतळापासून वातानुकूलीत बसनेच पुन्हा पुणे पर्यंत शेतक-यांना आणुन सोडणे कंपनीची जबाबदारी राहील.

७) देशाबाहेरील अभ्यास दौ-यादरम्यान त्या त्या देशांमध्ये असलेले हवामानानुसार योग्य ते पोषाख, चलन, दूरध्वनी सेवा, वाहतूक नियम, बंधने, विविध अद्ययावत सोई सुविधांचा वापर करण्यासाठी सूचना इ. बाबत किमान एक आठवडापुर्व दौ-यास निवडलेल्या सर्व शेतक-यांना स्लाईड शो च्या माध्यमातून अवगत करावे.

८) अभ्यास दौरा दुय्यम दर्जाचा होईल अशी कोणतीही कार्यवाही होणार नाही याची जबाबदारी प्रवासी कंपनीची राहील.

९) प्रवासी कंपनी ज्या देशामध्ये अभ्यास दौरा घेऊन जाणार आहे त्या देशातील स्थानिक भेटीच्या संस्थेचे कंपनीचे दूरध्वनी क्रमांक दौरा व्यवस्थापकाकडे असणे आवश्यक आहे. ही माहिती दौ-यासोबत असणा-या अधिका-यांनासुध्दा देणे बंधनकारक राहील.

१०) शेतक-यांनी कंपनीबाबत दौरा व्यवस्थापनाकरीता दिलेल्या प्रतिक्रियांपैकी **७० टक्के** पेक्षा जास्त प्रतिक्रिया वाईट स्वरुपाच्या असल्यास कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येईल.

११) कृषि विभागाशी झालेल्या करारातील प्रवास, निवास, भोजन, भेटीबाबत ठरलेल्या अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१२) अभ्यास दौ-यातील सर्व शेतकरी/अधिकारी यांना ओळखीची खुण म्हणुन बॅचेस/कॅप/ट्रॅव्हल बॅग/इतर कोणतीही वस्तु देण्यात यावी. जेणेकरुन विविध भेटी दरम्यान गटातील शेतक-यांना ओळखता येईल.

शेतक-यांचा अभ्यास दौरा पूर्ण झाल्यानंतर दौ-यात सहभागी झालेल्या शेतक-यांची यादी सर्व जिल्ह्यांना व संभागांना आयुक्तालय स्तरावरुन पाठविण्यात येईल. तालुका/जिल्हा स्तरावर आयोजित केल्या जाणा-या कार्यशाळेत अशा शेतक-यांना त्यांच्या अभ्यास दौ-यातील अनुभव इतर शेतक-यांसमोर कथन करण्यास प्रोत्साहीत करुन त्यांना पाचारण करावे. तसेच दौ-यात सहभागी झालेल्या शेतक-यास त्याच्या स्वतःच्या शेतात त्याने पाहिलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास मार्गदर्शन करावे.

सोबतःविहीत प्रपत्रे.

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक(विस्तार व प्रशिक्षण)**
कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे

---------------------------------------------------

**विदेश अभ्यास दौ-यासंबंधीत शेतक-यांची वैयक्तीक माहिती.**
**शेतक-यांनी करावयाचा अर्ज**

| | |
|---|---|
| १) शेतक-याचे पूर्ण नाव (पारपत्राप्रमाणे) | :- |
| २) पूर्ण पत्ता / मोबाईल क्र./दूरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसह) | :- |
| ३) जन्म तारीख व वय | :- |
| ४) शिक्षण (प्रमाणपत्रासह-झेरॉक्स) | :- |
| ५) शेतक-याच्या नावे असलेल्या ७/१२ व ८-अ च्या उता-याची प्रत. | :- |
| ६) शेतकरी कुटूंबाच्या शिधापत्रिकेची प्रत जोडावी. | :- |
| ७) वैध पारपत्राची पूर्ण झेरॉक्स प्रत जोडावी. | :- |
| ८) कोणत्या देशात जाण्यास तयार आहे व त्याबाबतचे भेटीचे नियोजन. | :- |
| ९) यापुर्वी शासकीय योजनेमधुन स्वतः किंवा कुटूंबातील व्यक्तीने (पती, पत्नी व अविवाहीत मुले) विदेश दौरा केला आहे काय, असल्यास तपशील द्यावा. | :- |
| अ) कोणी केला? | :- |
| ब) कोणामार्फत केला? (शासन/स्थानिक स्वराज्य संस्था/स्वतः) | :- |
| क) कोणत्या देशामध्ये केला? | :- |
| १०) शेतक-याने स्वतः विमा पॉलीसी घेतली असल्यास कागदपत्र सादर करावे. | :- |
| ११) आपत्कालिन परीस्थितीमध्ये जवळच्या दोन नातेवाईकांचे संपर्क पत्ते (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व ईमेल) | :- |

स्वाक्षरीः

(नावः )

शेतक-याचा फोटो

**प्रपत्र-१**

## स्वयंघोषणापत्र

मी ------------------------------------------ वय ------ वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ----------------------- व्यवसाय --------------------- रा. ----------------------------------------------------------------------- येथील रहिवासी असून कृषि विभागामार्फत आयोजित केल्या जाणा-या शेतक-यांच्या देशाबाहेरील अभ्यास दौ-याकरीता खालीलप्रमाणे स्वखूशीने लिहून देत आहे.

मी लिहून देतो/देते की, सदर दौ-यादरम्यान माझ्या वैयक्तीक वागणुकीमुळे माझ्या किंवा माझ्या देशाच्या अभिमानास तडा जाईल असे कोणतेही वर्तन करणार नाही. दौ-यादरम्यान दुर्वर्तन (यामध्ये मद्य प्राशन करुन इतरांना त्रास होईल असे वागणे, दौ-याच्या निश्चित वेळेचे पालन न करणे, नियोजीत केलेल्या स्थळ/भेटी इत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य न देणे, परदेशातील सार्वजनिक ठिकाण व भेटींच्या ठिकाणांच्या नियमांचे पालन न करणे इ.) केल्याचे आढळल्यास कृषि विभागामार्फत आकारण्यात येणा-या संबंधीत देशाच्या चलनाएवढी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यास माझी सहमती आहे.

तसेच माझ्या दुर्वर्तनामुळे परदेशातील एखाद्या देशामार्फत माझ्यावर काही शासकीय कारवाई (यामध्ये व्हीसा रद्द होणे किंवा माझ्या वैयक्तीक विदेश दौ-यास बंदी करणे) अथवा दंडात्मक कारवाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. दंड म्हणून होणारा सर्व खर्च मला स्वतःला सोसावा लागणार आहे, याची मला जाणीव आहे.

मी लिहून देतो/देते की, प्रवास कालावधीत कोणत्याही स्वरुपाचा अपघात किंवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी कृषि विभागाची राहणार नाही. ती माझी जबाबदारी राहील. अशा कोणत्याही घटनेच्यावेळी दौ-यातील इतर सहका-यांचा भेटीचा कार्यक्रम न चुकता नियमीत चालू राहील याकरीता आवश्यक ते निर्णय घेऊन मी वैयक्तीकरित्या/माझ्या कटूंबियांच्या मदतीने आवश्यक ती कार्यवाही करेन.

मी लिहून देतो/देते की, मी अभ्यास दौ-याच्या मंजूर कालावधीनुसार संबधीत गटासोबत पुन्हा भारतात परत येईन. अन्यथा नियमानुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहीन. दौरा कार्यक्रमाव्यतरिक्त इतर कोणत्याही भेटींच्या बाबत मी आग्रह धरणार नाही व विभागाने निश्चित केलेला कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व ठिकाणी आवश्यकतेनुसार सहभागी होईन.

मी सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की,

१. मी यापुर्वी कोणत्याही शासकीय योजनेच्या अर्थसहाय्याने विदेश दौरा केलेला नाही.
२. मी स्वतः शेतकरी असून माझे उत्पन्नाचे स्त्रोत व माझी उपजिवीका शेतीवरच अवलंबून आहे.
३. मी कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी सेवेत नाही. तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. व्यावसाईक नाही.

मी याद्वारे घोषीत करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीप्रमाणे खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिताअन्वये किंवा सबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला पूर्ण जाणीव असून याबाबत माझी काहीही तक्रार असणार नाही.

ठिकाण : (शेतक-याची सही)

दिनांक- / /२० (नाव ------------------------------------------------)

**(सदरचे घोषणापत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रतीस्वाक्षरीत करावे)**

शेतक-याचा
फोटो

**<u>प्रपत्र-२</u>**

**स्वयंसाक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र**

मी ---------------------------------------------- वय ------ वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ------------------------ व्यवसाय -------------------------------- रा.---------------------------------------------------------------------------- याद्वारे घोषीत करतो / करते की, मी स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिताअन्वये किंवा संबंधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला पूर्ण जाणीव असून याबाबत माझी काहीही तक्रार असणार नाही.

ठिकाण : (शेतक-याची सही)
दिनांक- / /२० (नाव ------------------------------------------------------)

**(सदरचे घोषणापत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रतीस्वाक्षरीत करावे.)**

**<u>प्रपत्र-३</u>**

**राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या योजनेअंतर्गत अभ्यास दौ-यास जाऊ इच्छिणा-या अधिका-यांनी भरुन द्यावयाचे प्रपत्र**

| अ. क्र. | नाव व पत्ता दूरध्वनी क्रमांक (निवास) | सध्याचे पदनाम, कार्यालय संपर्क क्रमांक (कार्यालय) मोबाईल क्रमांक, ईमेल | सध्याच्या पदाची वेतनश्रेणी | विवाहीत/ अविवाहीत | स्त्री/ पुरुष | शैक्षणीक आर्हता | पारपत्र क्रमांक व वैध कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

| रुजु दिनांकापासून आतापर्यंत काम केलेली पदे व तपशील | | विभागीय चौकशी यापुर्वी झाली काय, सुरु आहे काय, प्रस्तावीत आहे काय? | आतापर्यंत राज्य/ राष्ट्रीय पातळीवर घेतलेले प्रशिक्षण | यापुर्वी परदेश दौरा/प्रशिक्षण शासकीय खर्चाने केले आहे काय? | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद | कालावधी | | | देश | विषय | कालावधी | कोणत्या योजनेअंतर्गत |
| ९ | १० | ११ | १ | १३ | १४ | १५ | १६ |

| मत्ता व दायित्व दाखला सादर केल्याचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|
| १७ | १८ | १९ |

**अधिका-याची स्वाक्षरी, पदनाम व कार्यालयाचा पूर्ण पत्ता**

**(जिल्हा / विभाग प्रमुख यांनी प्रतीस्वाक्षरीत करावे)**

**प्रपत्र-४**

राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे
अभ्यास दौ-याबाबत शेतक-यांचे अभिप्राय

| | | |
|---|---|---|
| १ | शेतक-याचे पुर्ण नाव व पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक | |
| २ | अभ्यास दौरा केलेल्या देशांची नावे | |
| ३ | प्रवासी कंपनीचे नाव | |
| ४ | शेतक-यांचा अभ्यास दौरा करण्यामागील उद्देश | |
| ५ | प्रवासाचा कालावधी | |
| ६ | विमान सेवेचा दर्जा | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ७ | अभ्यास दौ-यावेळी प्रवासी कंपनीकडून निवासस्थानाची करण्यात आलेली व्यवस्था. | (१) अति उत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ८ | हॉटेलचा दर्जा | १) २-स्टार २) ३-स्टार ३) ४-स्टार ४) इतर |
| ९ | चहा, नाश्ता, दुपार व सायंकाळच्या जेवणाची सोय उत्तम होती काय? | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १० | अभ्यास दौ-यात कृषि विषयक स्थळे इत्यादींना भेटीचे केलेले नियोजन. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| ११ | संबंधीत देशात कृषि विषयक स्थळ दर्शनासाठी कंपनीकडून करण्यात आलेली बस व्यवस्था कशी होती? | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १२ | प्रवासासोबत प्रवासी कंपनीचे व्दिभाषी/ कृषि विषयक मार्गदर्शकांचे सहकार्य. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |
| १३ | प्रवासासोबत असलेल्या कृषि विभागाच्या अधिका-यांनी कृषि विषयक केलेले मार्गदर्शन. | (१) अतिउत्कृष्ट (२) उत्कृष्ट (३) सर्वसाधारण (४) असमाधानकारक |

| | | |
|---|---|---|
| १४ | एकंदरीत अभ्यास दौ-याकरीता शासनाकडून करण्यात आलेलेल्या सोयी सुविधांबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय. | |
| १५ | अभ्यास दौ-यादरम्यानिमीत्त मिळालेले कृषि विषयक ज्ञान याबाबत थोडक्यात माहिती द्यावी. | |
| १६ | अभ्यास दौ-याच्यावेळी आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतावर आणि आपल्या परिसरामध्ये कशाप्रकारे करणार आहात, याबाबतचा सविस्तर अभिप्राय. | |

टीपः आवश्यकतेनुसार स्वतंत्र पानाचा/पृष्ठाचा वापर करावा.

शेतक-याची सही -

शेतक-याचे नाव -

भ्रमणध्वनी क्रमांक -

# प्रपत्र-५

## प्रस्ताव तपासणी यादी

१. अभ्यास दौ-याकरीता जाणारा लाभार्थी हा स्वतः शेतकरी आहे काय?

२. स्वतःच्या नावे असलेला ७/१२ व ८-अ उता-याची चालू वर्षाची प्रत सोबत जोडली आहे काय?

३. उता-यावर नोंदविलेले क्षेत्र पिकाखालील आहे काय?

४. शेतक-याने उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, हे शेतक-याने स्वसाक्षांकित केले आहे काय?

५. शेतक-याचे वय वर्ष २५ ते ६० या दरम्यान आहे काय? त्यासाठी पुरावा म्हणून तत्सम प्रमाणपत्र सोबत जोडावे.

६. शेतकरी शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी संस्थेत नोकरीस तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, वकील, सीए (चार्टड अकाउंटंट), अभियंता, कंत्राटदार इ. व्यावसाईक आहे काय?

७. शेतकरी वैध पारपत्रधारक आहे काय? पुराव्यासाठी पारपत्राची झेरॉक्स प्रत जोडावी.

८. शेतक-याने यापूर्वी शासकीय (केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत, कृषि विद्यापिठामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत) अर्थसहाय्याने विदेश दौरा केला आहे काय? पारपत्राच्या सर्व पानांची झेरॉक्स प्रत जोडावी.

९. शेतकरी परदेश अभ्यास दौरा करण्यास पात्र असल्याबाबत तालुका/जिल्हा स्तरावरील शासकीय आरोग्य अधिकारी किंवा तत्सम दर्जाच्या वैद्यकीय अधिका-याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले आहे काय?

**<u>प्रपत्र-६</u>**

**शेतक-यांच्या अभ्यास दौ-यांच्या प्रस्तावांवर विविध स्तरावर विहीत कालावधीत खालीलप्रमाणे करावयाची कार्यवाही करावी.**

| अ.क्र. | स्तर | करावयाची कार्यवाही | कार्यवाहीची मुदत |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी योजनेअंतर्गत शेतक-यांचे अर्ज मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रामधून जाहीरात देणे. | २५/७/२०१७ अखेर |
| २ | तालुका | तालुका स्तरावर दिनांक ३१/८/२०१७ पर्यंत प्रस्ताव स्विकारणे. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची मार्गदर्शक सूचनेप्रमाणे छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवणे. | ११/९/२०१७ अखेर |
| ३ | जिल्हा | तालुका स्तरावरुन प्राप्त झालेल्या पात्र शेतक-यांची सोडत पध्दतीने जेष्ठता क्रमवारी निश्चित करुन यादी करावी व विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकडे प्रस्तावासह पाठवणे. | ०५/१०/२०१७ अखेर |
| ४ | विभाग | जिल्हा स्तरावरुन प्राप्त झालेले प्रस्ताव मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आहेत काय, याची तपासणी करुन प्रस्तावांच्या क्रमवारीसह कृषि आयुक्तालयास शिफारशीसह सादर करणे. | २०/१०/२०१७ अखेर |